# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

**दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९** **ई-मेल: directorcrs78@gmail.com**


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/1874 /२०२२ दि. 29/ 03 /२०२२

## निविदा सूचना

**विषय:- सन २०२२-२३ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/ दि. २२ जून, २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.
३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
५. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
७. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.
८. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
९. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१०. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१३. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१६. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **०८.०४.२०२२** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">कामाचा तपशील</th><th>दर (रु.)</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td colspan="2">निंदण करणे</td><td>प्रति हे.</td><td rowspan="23">प्रक्षेत्रावरील पिके -<br>सोयाबीन, कपाशी, मुंग, उडीद, ज्वारी, बाजरी, तूर, बोरू, ढेंचा, करडी, हरभरा, गहू, जवस, मोहरी, एरंडी, सुर्यफुल, तीळ, कराळ व इतर पिके<br><br>प्रक्षेत्रावरील फळबाग -<br>सिताफळ, चिकू, आंबा, निंबू, जांभूळ, पेरू, चिंच, आवळा व इतर फळबाग</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">पिकातील भेसळ काढणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">पिकातील विरळणी करणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">बियाणे टोकण करणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td rowspan="2">५</td><td rowspan="2">पिकांना/फळबागेला पाणी देणे</td><td>दांड पद्धत</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>स्प्रिंकलर</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td colspan="2">पिकांना/फळबागेला खत देणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>७</td><td colspan="2">पिकांची कापणी, मळणी व गंजी लावणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>८</td><td colspan="2">कपाशी वेचणी करणे</td><td>प्रति किलो</td></tr>
<tr><td>९</td><td colspan="2">मुंग व उडीद शेंगा तोडणे</td><td>प्रति किलो</td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="2">शेतातील धसकटे/काडीकचरा वेचणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>११</td><td colspan="2">पिकांचे, फळझाडांचे ई. संरक्षण करणे/पहारेकरी</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="2">पिकातील डवरणी व वखरणी करणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>१३</td><td colspan="2">पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>१४</td><td colspan="2">फळबाग निगडीत दैनंदिन कामे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>१५</td><td colspan="2">शेतीशी निगडीत दैनंदिन कामे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">भांडार विभागातील कामे</td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">अ. उत्पादित मालाचे वजन करणे</td><td>प्रति क्विं.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब. उत्पादित माल दळणवळण करण्याकरिता मालाचे लोडिंग व अनलोडिंग</td><td>प्रति क्विं.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">क. कपाशी जिनिंग करणे</td><td>प्रति क्विं.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">ड. कपाशी स्वच्छ करणे</td><td>प्रति क्विं.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">इ. बीज प्रक्रिया केंद्राची कामे (प्रक्रिया, बगिंग, टगिंग, बीज प्रक्रिया ई.)</td><td>प्रति क्विं.</td></tr>
</table>

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

* **स्वाक्षरी**